# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१२ जानेवारी, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# सहा. पोलीस उपनिरीक्षक श्रीपाद बल्की ट्रायथ्लॉन स्पर्धेत ‘‘टायगर मॅन’’ पुरस्काराने सन्मानीत

दिनांक ०९/०२/२०२० रविवार रोजी पोलीस जिमखाना नागपुर येथे प्रथमच पार पडलेल्या प्रो हेल्थ फाऊडेशन तसेच माईल्स अॅन्ड मीलर्स द्वारे आयोजीत नॅशनल टायगर मॅन ट्रायथ्लॉन स्पर्धेत चंद्रपुर पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक श्रीपाद बल्की यांनी ३ कीमी पोहोणे + १२० कीमी सायकलींग + २५ कीमी धावणे या स्पर्धत सलग ९ तास ४८ मिनिटात पुर्ण करुन “टायगर मॅन” हा बहुमान प्राप्त केला आहे. टायगर मॅन या प्रकारात ओपन कॅटेगीरीत एकुण ६० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ४४ स्पर्धकांनी ही शर्यत १२ तास ३० मिनिट या कट ऑफ वेळेमधे पुर्ण केली असुन त्यात श्रीपाद बल्की यांचा त्यांच्या ३६ ते ४५ या वयोगटात १२ क्रमांक तसेच ओपन वयोगटात २६ क्रमांक होता.

या स्पर्धेत टायगर ट्रायथ्लॉन, ऑलंपीक ट्रायथ्लॉन, टायगर डयुअथलॉन, स्प्रींट ट्रायथ्लॉन व ऑलंपीक ट्रायथ्लॉन टीम व टायगर डयुअथलॉन टीम अशे एकुण विवीध ६ प्रकारचे इव्हेंट घेण्यात आलेले होते. स्पर्धा राष्ट्रीय स्तराची असल्याने संपुर्ण भारतातुन २५० स्पर्धक सहभागी झाले होते

राष्ट्रीय स्तरावर जलतरण तसेच वॉटर पोलो या क्षेत्रात सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक श्रीपाद बल्की यांनी २००६ ते २०१४ पर्यंत महाराष्ट्र पोलीस संघाचे तसेच भारतीय पोलीस संघाचे नेतृत्व केलेले आहे. श्री. श्रीपाद बल्की यांचे पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेडडी तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे मा. अभिनंदन करून ही पोलीस दलासाठी अभिमानाची कामगीरी असल्याची भावना व्यक्त केली. तसेच श्री.श्रीपाद बल्की यांनी सुध्दा मा. पोलीस अधीक्षक आणि अपर पोलीस अधीक्षक यांचे आभार व्यक्त केले आहे

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)


# विद्युत आणि नळाचे बिलाच्या वादावरून घरमालकास मारहाण करणाऱ्या आरोपीस कारसावाची शिक्षा

पोलीस स्टेशन बल्लारशाह अंतर्गत फिर्यादी यांचे घरी कियाराने राहुण त्यांचेसोबतच वाद घालुन मारहाण करणाऱ्या आरोपींना ११/०२/२०२० रोजी **मा. श्रीमती चौधरी, जेएमएफसी कोर्ट बल्लारशाह, चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन बल्लारशाह अंतर्गत महाराणा प्रताप वार्ड बल्लारशाह येथील फिर्यादी यांनी आपल्या घरी आरोपी नामे नाझीर शेख उर्फ कलवा करम शेख उर्फ उदान शेख याला आणि याची पत्नी हिला आपल्या घरी किरायाने ठेवले होते. दिनांक २९/०३/२०१२ फिर्यादीने आरोपीला इलेक्ट्रीक आणि नळाचे बिल याबाबत बोलले असता, आरोपीने फिर्यादीस आणि त्याचा आईस शिवीगाळ केली आणि फिर्यादीच्या डोक्यावर आणि त्यांचे आईच्या हातावर मारहाण करून जख्मी केले. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. ४५/२०१२ कलम ३२४,५०४,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तपासी अधिकारी पोउपनि. श्री. एस.बी. गडपल्लीवार पोलीस स्टेशन बल्लारशाह यांनी आरोपी नामे नाझीर शेख+१ यांना अटक करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ११/०२/२०२० रोजी **आरोपीस कलम ३२४ भादंवि ६ महिने कारावासाची शिक्षा मा. श्रीमती चौधरी मॅडम, जेएमएफसी कोर्ट बल्लारशाह, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. सौ. शितल दहीकर मॅडम, सरकारी अभियोक्ता** आणि कोर्ट पैरवी म्हणुन मपोशि. अर्चना सोनकांबळे, पोलीस स्टेशन बल्लारशाह यांनी काम पाहिले.

———————————————————————————————

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१२ जानेवारी, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेकडुन घरफोडीचा गुन्हा उघड

## आरोपींकडुन चोरीसे गेलेले सोन्याचे दागीने हस्तगत

पोलीस स्टेशन रामनगर येथे दाखल अपराध क्रं. ७८/२०२० कलम ४५७,३८० भादंवि या गुन्हयामध्ये नगीनाबाग चंद्रपुर येथुन सोने चांदीचे दागीने चोरीस गेल्याबाबत गुन्हा नोंद होता. सदर गुन्हयाचा तपास सुरू असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासपथकाने गोपनीय माहितीद्वारे एका आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीकडुन खालीलप्रमाणे मुददेमाल जप्त केला आहे.

१) किं. २५,०००/—रू.— दोन सोन्याच्या अंगठया वजन प्रत्येकी ५ ग्रॅम
२) किं. ७,५००/—रू.— दोन नग सोन्याचे वेल वजन ३ ग्रॅम
३) किं. ३,५००/—रू. —एक सोन्याचा मुखडा वजन १.५ (दिड) ग्रॅम
४) किं. १२,५००/—रू. —दोन नग सोन्याचे झुमके वजन ५ ग्रॅम
५) किं. १०,०००/—रू.— एक सोन्याचे मंगळसुत्र डोरले मणी वजन ४ ग्रॅम
६) किं. १,५००/—रू. —दोन चांदीच्या पायपटटया वजन ६ तोळे
७) किं. ३०००/—रू.— नगदी रक्कम

असा एकुण ६३,०००/—रू. चा माल आरोपी नामे व्यकंटी रामा घोडमारे रा. विरशी वडसा जि. गडचिरोली याचेकडुन हस्तगत करण्यात आल आहे.

सदर प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे, यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थागुशा चंद्रपुर यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक विकास मुंढे, पोहवा महेंद्र भुजाडे नापोशि अविनाश दशमवार, मनोज रामटेके, पोशि कुंदन बावरी, संजय वाढई, जावेद सिध्दीकी, सर्व स्थागुशा, चंद्रपुर यांनी आरोपी अटक व माल हस्तगत करण्याकरीता महत्वाची भुमिका बजावली आहे.पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहे.

———————————————————————————————————